<u>नि. फौ. ख. क्र. २६८/२०२३</u> निशाणी ३६

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – रुक्माबाई श्रीधर बोंडे

वय – ६५ वर्षे, व्यवसाय – शेती,

पत्ता – रा. बेलखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मल दोन मुले व एक मुलगी आहे. माझा मोठा मुलगा नामे विजय श्रीधर बोंडे हा निमकर्दा येथे राहतो. दि.१०.०८.२०२३ च्या दोन महिने पुर्वी पासून माझ्या आईची तब्येत ठिक नसल्याकारणाने मी निमकर्दा येथे माझ्या मुलाकडे राहावयास गेले होते. दि.१०.०८.२०२३ रोजी मी व माझी सुन सुवर्णा विजय बोंडे असे घरी होतो. त्या दिवशी संध्या. ५ ते ५.३० वा. सुमारास माझ्या मुलाच्या घरा शेजारी राहणारा नामदेव देठे यांनी त्यांच्या ओट्याच्या समोर खोदकाम केले होते, त्या खोदकामात दगडाचे मोठे मोठे गोटे टाकले. त्यावेळी माझी सुन त्यांना म्हणाली की, तुम्ही तुमच्या हद्दीमध्ये बांधकाम करा. त्यानंतर, माझ्या सुनेस नामदेव नारायण देठे, किसना नामदेव देठे व रामदास देठे यांनी माझ्या सुनेस शिवीगाळ केली व विटा व गोटे घेवून तिच्या अंगावर आले. नामदेव नारायण देठे, किसना नामदेव देठे व रामदास देठे हे माझ्या सुनेस जे म्हणाले की, तुमच्याने जे होते ते तुम्ही करा.

२. मी त्यांना समजाविण्याकरीता त्या ठिकाणी गेले आणि त्यांना सांगितले की, असे करु नका. त्यावेळी किसना याने फावडे घेतले व माझ्या उजव्या हाताच्या खांद्यावर मारले त्यामुळे माझ्या खांद्याला दुखापत झाली. (साक्षीदार हिने पाणी पिण्यास मागितले तसेच तिची तब्येत बरी नसल्याबाबत तीने सांगितले. न्यायालयाने तिला साक्ष थांबविण्याबाबत विचारले असता त्यांनी साक्ष देण्याची तयारी दर्शविली.) त्यानंतर मी खाली पडली. त्यावेळी माझा भाचा प्रशांत देठे व रितेश हे त्या ठिकाणी आले त्यांनी मला वैद्यकीय उपचाराकरीता डॉ. विशाल भागवत यांच्या दवाखान्यामध्ये घेवून गेले. माझ्या वैद्यकीय

उपचारादरम्यान माझी सुन माझ्या जवळ होती. डॉक्टरांनी माझ्यावर वैद्यकीय उपचार केले. डॉक्टरांनी माझ्या खांद्याचे फ्रॅक्चर असल्यामुहे ऑपरेशन करण्यास सांगितले.

३. पोलीसांनी सदर घटनेबाबत माझी विचारपुस केली होती. तसेच मी बाळापूर न्यायालयामध्ये जबाब दिला होता. आता न्यायालयासमोर एका लिफाफ्यातील साक्षीदार हिचा दि.३०.०८.२०२३ रोजीचा फौ.प्र.सं. कलम १६४ अन्वये नोंदविलेला जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझा डाव्या अंगठ्याचे निशाण असून त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे नोंद केलेला होता, ता खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३७** देण्यात येत आहे. ज्या फावड्याने मला मारहाण केली ते पाहिल्यास मी ओळखू शकते. आता आर्टीकल अ कडील फावडे दाखविण्यात आले, ते तेच असून मला त्याने मारहाण केली होती. आरोपी नामदेव नारायण देठे, किसना नामदेव देठे व रामदास देठे यांना साक्षीदार यांनी न्यायालयात ओळखले आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. मुन्ना खान यांचे मार्फत उलटतपासः</u>**

४. डॉ. विशाल भागवत हे माझे नातेवाईक नाहीत. पोलीस श्री. गोमासे हे देखील माझे नातेवाईक नाहीत. आरोपीसोबत माझ्या कुटुंबाचा सदर घटनेपुर्वी कोणताही वाद नव्हता. प्रल्हाद नारायण देठे हे माझे वडील होते. माझ्या वडीलांनी आरोपीवर दिवाणी अथवा फौजदारी केस दाखल केली होती, याबाबत मला माहित नाही. शंकर नारायण देठे, नामदेव नारायण देठे, कासाबाई नारायण देठे, किसन नामदेव देठे तसेच यमुनाबाई दिगंबर देठे यांना मी ओळखते.

५. मी डॉ. विशाल भागवत यांच्याकडे वैद्यकीय उपचाराकरीता गेले तेव्हा मी त्यांना घटनेबाबत काही सांगितले नव्हते. माझी सुनेने डॉक्टरांना सदर घटनेबाबत काही माहिती दिली होती अथवा नाही, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी सुन मी दवाखान्यामध्ये ॲडमीट असताना त्या दिवशी पो.स्टे.मध्ये रिपोर्ट देण्याकरीता जाते असे सांगून ती दवाखान्यातून निघून गेली होती. त्यानंतर दि.११.०८.२०२३ रोजी माझी सुन पुन्हा दवाखान्यामध्ये सकाळी आली तेव्हा तिने पो.स्टे. येथे सदर घटनेबाबत रिपोर्ट दिला असे मला सांगितले होते. दि.११.०८.२०२३ रोजी मला दवाखान्यातून सोडले

असेल, असे मला वाटते. हे म्हणणे खरे नाही की, दि.११.०८.२०२३ रोजी माझी सुन दिवसभर माझ्या सोबत होती.

६. मला शिवी समजते. मी माझा जबाब पोलीसांना देतेवेळी मला कोणत्या प्रकारची शिवी आरोपींनी दिली, याबाबतचा मजकूर सांगितला होता अथवा नाही, हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझी चौकशी निमकर्दा येथील घरी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी निमकर्दा येथे माझ्या घरी गेले तेव्हा माझ्या सुनेने काय रिपोर्ट दिला ही माहिती तिने मला सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या घराच्या दरवाजा येथे येत असताना मी पडले व मला दुखापत झाली. आता मला आर्टीकल अ कडील फावडे दाखविण्यात आले, सदरचे फावड्यानी किसना यानी मला पुढच्या बाजूने अथवा पाठच्या बाजूला मारले होत हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नाही म्हणून मला किसना यानी कोणत्या बाजूने फावड्याने मारले ही बाब आठवत नाही.

७. मी डिगांबर राऊत, अरुण जामोदे, निळू खेळकर, नितीन शर्मा व विनायक यादव यांना मी ओळखते. कारण ते माझ्या घराच्या आजूबाजूला राहतात. आमची बोलचाल झाली, त्यावेळी तेथे आराडाओरडा झाला होता, त्यावेळी तेथे लोक जमा झाले होते. दि.१०.०८.२०२३ रोजी विजय, रितेश, प्रशांत, हरीभाऊ यांनी नामदेव यास शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली तसेच त्याच्या बांधकामामध्ये अडथळा निर्माण केला, असे काही घडले नव्हते. सदर घटनेबाबत नामदेव यानी दि.१०.०८.२०२३ रोजी विजय, रितेश, प्रशांत, हरीभाऊ यांच्या विरुध्द पो.स्टे. येथे फिर्याद दिली होती, याबाबत मला माहित नाही.

८. मी माझा जबाब देताना पोलीसांना "मी त्यांना समजाविण्याकरीता त्या ठिकाणी गेले"' हा मजकूर सांगितला होता. सदरचा मजकूर हा माझ्या जबाबात का लिहीलेला नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

९. न्यायालयामध्ये माझा जबाब कोणत्या तारखेला नोंद केला होता याची तारीख निश्चित मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयामध्ये जबाब नोंद करणेकामी आले तेव्हा माझ्यासोबत माझा मुलगा विजय, सुन सुवर्णा, प्रशांत हे देखील होते.

सदर जबाब नोंद करणेकामी पोलीसांनी मला समन्स दिले होते. त्यावेळी माझ्यासोबत पोलीस होते अथवा नव्हते हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला न्यायालयात जबाब काय द्यायचा आहे, याबाबतची माहिती माझी सुन व पोलीसांनी सांगितले त्यानुसार मी जबाब न्यायालयासमोर दिला.

१०. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे स्वतःचे घर बांधत आहेत, ही गोष्ट मला व माझ्या नातेवाईकांना पटत नव्हती, म्हणून आम्ही त्यांच्या कामामध्ये अडथळा निर्माण केला होता व त्यांना शिवीगाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी आमच्या नातेवाईकाविरुध्द फिर्याद दिल्यामुळे सदरची खोटी फिर्याद माझ्या सुनेने आरोपीविरुध्द दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २०.११.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.11.20 16:21:26 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | २०/११/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | २०/११/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | २०/११/२०२५ |